(४०५)

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी
(वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि
नियम २००८
सामूहिक वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन
आराखडाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय
कन्व्हर्जन्स समितीची स्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन आदेश क्रमांकः बैठक-२०१३/प्र.क्र.२७२/का-१४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- १२ जून, २०१५.

वाचा -

१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२.

२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. पेसा-२०१५/प्र.क्र.१९/का.१७, दिनांक २१/०४/२०१५.

प्रस्तावना -

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६, नियम, २००८ व सुधारित नियम, २०१२ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यामध्ये अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वत:च्या उपजीविकेकरिता वनजमिनी धारण करण्याचा, त्यामध्ये राहण्याचा हक्क, निस्तार सारखे हक्क, गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क, पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास हक्क असणे, निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्त्रोताचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन, विनियमन व व्यवस्थापन करण्याचे हक्क आहेत.

RR 1006
2094

17.6

16 JUN 2015

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ तसेच सुधारित नियम २०१२ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विशेषत: या कायद्यांतर्गत कलम ३(१) खाली मंजूर करण्यात येणाऱ्या सामूहिक वनहक्कांचे (CFR) नियोजनबध्द पध्दतीने व्यवस्थापन करुन ग्रामसभेचे बळकटीकरण करण्याकरिता अशासकीय संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पावर संनियंत्रण ठेवणे, मार्गदर्शन करणे, योजनेचे मुल्यमापन करणे तसेच योजनेचा नियमित आढावा

घेण्याकरिता दिनांक ०५/०३/२०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय सुकाणू समितीची (State Level Steering Committee) स्थापना करण्यात आली आहे.

MOTA-UNDP योजनेंतर्गत "खोज" संस्थेतर्फे ५ जिल्हयातील ५० गावांमध्ये हाती घेतलेला पथदर्शी प्रकल्प दिनांक ३०/०४/२०१५ रोजी पुर्णत्वास आला आहे. यासंदर्भात राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या दिनांक २०/०५/२०१५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार सदर पथदर्शी प्रकल्पातील ५० गावांमधील व्यवस्थापन आराखडयानुसार ग्रामसभांनी हाती घ्यावयाच्या कामांसाठी व ती कामे पार पाडण्यासाठी क्षेत्रियस्तरावर कार्यरत असलेल्या वेगवेगळया शासकीय यंत्रणांचे समन्वयन साधून एककेंद्राभिमुखता (convergence) करण्याची गरज असल्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहे:-

**शासन निर्णय-**

सामूहिक वनहक्क ( सामूहिक वनसंसाधन) मंजूर करण्यासंदर्भात वनावर उपजिविका अवलंबून असलेल्या ग्रामीण समूहाच्या शाश्वततेकरिता वनांचे व नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण व दिर्घकाळ शाश्वतता राखण्याकरिता परिणामकारक व कार्यक्षम व्यवस्थापनाची पध्दत अवलंबविण्यासाठी MOTA-UNDP योजनेंतर्गत) "खोज" व इतर अशासकीय संस्थेतर्फे हाती घेतलेला पथदर्शी प्रकल्पांतर्गत ५ जिल्हयातील ५० गावांसाठी तयार केलेल्या व्यवस्थापन आराखड्यानुसार सामूहिक वनहक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी व घ्यावयाच्या कामांसाठी वन विभाग, कृषी, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभाग, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, (मनरेगा घटक) यांच्या सहकार्याने सामूहिक वनहक्कांचे व्यवस्थापन करण्यासाठी क्षेत्रिय स्तरावरील विविध शासकीय यंत्रणांच्या सेवा उपलब्ध करुन देणे तसेच सामूहिक वनहक्कांतर्गत ग्रामसभांकडून हाती घेतलेल्या कामांचे समन्वयन साधण्यासाठी "जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती" स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी हे "जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती" चे अध्यक्ष असतील व वन विभागाचे उपवन संरक्षक ( DCF) हे सदस्य सचिव असतील. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | : | अध्यक्ष |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद, | : | सदस्य |
| ३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | : | सदस्य |
| ४) जिल्हा कृषी विकास अधिकारी | : | सदस्य |
| ५) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | : | सदस्य |
| ६) सहाय्यक संचालक,मत्स्यव्यवसाय संचालनालय | : | सदस्य |
| ७) उप वनसंरक्षक | : | सदस्य सचिव |

16 JUN 2015

समितीच्या कार्यान्वयामध्ये वरील प्रमाणे अन्य विभागाच्या अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्यास समिती त्यांना बैठकीसाठी आमंत्रित करु शकेल. तसेच ग्रामसभांचे २ प्रतिनिधी दरवर्षी आळीपाळीने कार्यरत असतील.

"जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती" अमरावती, गडचिरोली, गोंदिया, नागपूर व यवतमाळ ह्या ५ जिल्हयातील ५० गावांतील सामूहिक वनहक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी क्षेत्रिय स्तरावरील उपलब्ध विविध शासकीय यंत्रणांचे (Resources) कन्व्हर्जन्स करेल.

ग्रामसभेचा १० वर्षे कालावधीचा "संवर्धन व वन व्यवस्थापन आराखडा" हा वन विभागाच्या वर्कींग प्लॅनचा अविभाज्य भाग राहील. पेसा अंतर्गत गावांना त्यांच्या सामूहिक वनहक्क आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी आदिवासी विकास विभागाच्या ५ टक्के निधीतून संदर्भांकित दिनांक २१/०४/२०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार खर्च करण्याची मुभा राहील.

अमरावती, गडचिरोली, गोंदिया, नागपूर व यवतमाळ ह्या ५ जिल्हयातील ५० गावांची यादी सोबतच्या परिशिष्ठ- अ मध्ये नमूद केली आहे.

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे या समित्यांची नोडल एजन्सी म्हणून काम पाहतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१५०६१५१७२२५६३७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सु. द. नाईक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४ प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
५ प्रधान सचिव (कृषी व पदुम), मंत्रालय, मुंबई
६. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
८. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
९. सर्व जिल्हाधिकारी.
१०. सर्व मुख्य प्रशासकीय अधिकारी, जिल्हापरिषद.
११. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर,अमरावती,
१२. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१३. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्या.अधिकारी,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.
१४. निवड नस्ती.(का.१४)आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. बैठक-२०१३/प्र.क्र. २७२/कार्या-१४, दिनांक १२ जून, २०१५ सोबतचे सहपत्र.

## परिशिष्ट- अ

### अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८

सामूहिक वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीची स्थापना करण्याबाबत.

अमरावती, गडचिरोली, गोंदिया, नागपूर व यवतमाळ ह्या ५ जिल्हयातील ५० गावांची यादी खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | संस्थेचे नांव | गावांची नांवे | तालुका | जिल्हा | सामूहिक वनहक्कातील क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|---|
| | | गडचिरोली जिल्हयातील १२ गांवे | | | |
| १ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | नारोटीमाल | आरमोली | गडचिरोली | ३४.२४ |
| २ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | नारोटीचक | आरमोली | गडचिरोली | २४६.८९ |
| ३ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | कुकडी | आरमोली | गडचिरोली | ८७.६६ |
| ४ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | मोहाटोला | आरमोली | गडचिरोली | ८७.६६ |
| ५ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | कुरांडीचक | आरमोली | गडचिरोली | ४३.६५ |
| ६ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | डोंगर्तामाशी | आरमोली | गडचिरोली | २१५ |
| ७ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | अम्बेटोला | गडचिरोली | गडचिरोली | ६०.२५ |
| ८ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | भिकार्मौशी | गडचिरोली | गडचिरोली | ७१.४ |
| ९ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | करमटोला | गडचिरोली | गडचिरोली | २९.५९ |
| १० | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | मौशिचक | गडचिरोली | गडचिरोली | ६६४ |
| ११ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | वाडेगाव | गडचिरोली | गडचिरोली | २२८.८६ |
| १२ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | चाम्बरडा | गडचिरोली | गडचिरोली | ४५.६९ |
| | | गोंदिया जिल्हयातील १५ गांवे | | | |
| १३ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | वासनी | देवरी | गोंदिया | ५५.०९ |
| १४ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | मोहांडी | देवरी | गोंदिया | १९१.४८ |
| १५ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | पौलझोला | देवरी | गोंदिया | ६३०.२८ |
| १६ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | सुंदरी | देवरी | गोंदिया | ४६२.९२ |
| १७ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | महाका | देवरी | गोंदिया | ३१५.१५ |
| १८ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | मेहताखेडा | देवरी | गोंदिया | ३११.१३ |
| १९ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | कोस्बी | देवरी | गोंदिया | २६८.३५ |
| २० | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | धवाल्खेडा | देवरी | गोंदिया | ५४८.९३ |
| २१ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | धम्दितोला | देवरी | गोंदिया | २९५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२ | युवा ग्रामिण | चीर्चाडी | सडक अर्जुनी | गोंदिया | १२२४ |
| २३ | युवा ग्रामिण | दल्ली | सडक अर्जुनी | गोंदिया | १२१० |
| २४ | युवा ग्रामिण | खडकी | सडक अर्जुनी | गोंदिया | १६९१.३४ |
| २५ | युवा ग्रामिण | राज्गुडा | सडक अर्जुनी | गोंदिया | ११९.८२ |
| २६ | युवा ग्रामिण | मोगरा | सडक अर्जुनी | गोंदिया | २११ |
| २७ | युवा ग्रामिण | उसिखेडा | सडक अर्जुनी | गोंदिया | ३७३ |
| अमरावती जिल्हयातील १५ गांवे | | | | | |
| २८ | खोज | पायविहीर | अचलपूर | अमरावती | १९२.९८ |
| २९ | खोज | नायाखेडा | अचलपूर | अमरावती | ६३३ |
| ३० | खोज | खातीजापूर | अचलपूर | अमरावती | ३६ |
| ३१ | खोज | उपात्खेडा | अचलपूर | अमरावती | १२९ |
| ३२ | खोज | भवाई | चिखलदरा | अमरावती | १७४.३६ |
| ३३ | खोज | लवादा (वन) | चिखलदरा | अमरावती | १७४.९९ |
| ३४ | खोज | चूनखडी | चिखलदरा | अमरावती | २६५.६६ |
| ३५ | खोज | घाना | चिखलदरा | अमरावती | ३७५ |
| ३६ | खोज | भांद्री | चिखलदरा | अमरावती | ४२० |
| ३७ | खोज | जैतादेही | चिखलदरा | अमरावती | ६६ |
| ३८ | खोज | बोधु | चिखलदरा | अमरावती | १०२.५ |
| ३९ | खोज | बुटीदा | चिखलदरा | अमरावती | १६६.६ |
| ४० | खोज | मेनघाट | चिखलदरा | अमरावती | ३७० |
| ४१ | खोज | रानामालूर | धारणी | अमरावती | ५० |
| ४२ | खोज | घोटा | धारणी | अमरावती | ५० |
| नागपूर जिल्हयातील ३ गांवे७५६.२८ | | | | | |
| ४३ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | लाखापूर | रामटेक | नागपूर | १३३.२२ |
| ४४ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | फुल्जारी | रामटेक | नागपूर | ५३.६७ |
| ४५ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था | अकोला | रामटेक | नागपूर | ३८.८७ |
| यवतमाळ जिल्हयातील ५ गांवे | | | | | |
| ४६ | ग्रामिण समस्या मुक्ती ट्रस्ट | आवळगांव | मारेगांव | यवतमाळ | ७५६.२८ |
| ४७ | ग्रामिण समस्या मुक्ती ट्रस्ट | दाभाडी | झरी झामणी | यवतमाळ | ५०९.१ |
| ४८ | ग्रामिण समस्या मुक्ती ट्रस्ट | चीच्घाट | झरी झामणी | यवतमाळ | २०८.१ |
| ४९ | ग्रामिण समस्या मुक्ती ट्रस्ट | पवनार | झरी झामणी | यवतमाळ | २६८.७१ |
| ५० | ग्रामिण समस्या मुक्ती ट्रस्ट | बोरगांव | झरी झामणी | यवतमाळ | ६७९.४७ |

-------------------------------------------